## मा.नाम.श्री पृथ्वीराजजी चव्हाण

**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**
**शनिवार, दि. १२ मार्च २०११**

माननीय कुलगुरू डॉ. एन. जे. पवार,
कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे,
परीक्षा नियंत्रक डॉ. बी.एम.हिर्डेकर,
क्रांतिअग्रणी जी. डी. उर्फ बापू लाड,
विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विद्याशाखांचे अधिष्ठाते,
अधिसभेचे, विद्या परिषदेचे आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य,
आज प्रमाणपत्रे प्राप्त करणारे पदवीधर आणि बंधु–भगिनींनो,

करवीर राज्य संस्थापिका महाराणी ताराबाई आणि सामाजिक न्यायाची मुहुर्तमेढ रोवणारे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नगरीत रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचे हे विद्यापीठ गेली पाच दशके अव्याहतपणे ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. शिवाजी विद्यापीठाची स्थापना १८ नोव्हेंबर, १९६२ रोजी झाली. येत्या १८ नोव्हेंबरला विद्यापीठ आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करणार आहे. अशा विद्यापीठाच्या पदवीदान समारंभ प्रसंगी उपस्थित राहताना मला अतिशय आनंद होत आहे. पदवी ग्रहण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे सुरुवातीला मी अभिनंदन करतो. आज या दीक्षांत समारंभाचे भाषण करण्याचे आमंत्रण देऊन आपण माझा जो बहुमान केला त्याबद्दल प्रथम कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आज क्रांतिअग्रणी जी. डी. उर्फ बापू लाड यांना डी. लिट. देऊन त्यांचा बहुमान केला जात आहे, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. श्री जी. डी. बापू हे अशा एका पिढीचे प्रतिनिधित्व करतात, की ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करुन परकीय सत्तेशी फार मोठा लढा दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांनी समाजसेवा हेच ध्येय उराशी बाळगून संपूर्ण आयुष्य समाजासाठी व्यतीत केले. प्रखर राष्ट्रप्रेम, सामान्यांप्रती कळकळ आणि सेवावृत्ती यांनी परिपूर्ण असे आदर्श आणि कृतार्थ आयुष्य जगले. त्यांना डी. लिट. देऊन त्यांचा उचित गौरव केल्याबद्दल मी शिवाजी विद्यापीठाचे अभिनंदन करतो.

ज्ञानमेवामृतम म्हणजे ज्ञान हेच अमृत हे शिवाजी विद्यापीठाचे बोधवाक्य आहे. विद्यापीठाची आजवरची वाटचाल या बोधवाक्याला साजेशीच आहे. विद्यापीठे ही केवळ पदवीधरांचे तांडे निर्माण करणाऱ्या शैक्षणिक संस्था असू नयेत. स्पर्धेच्या युगात समर्थपणे उभी राहील, अशी निती–मूल्याधिष्ठित

युवा पिढी निर्माण करण्याचे कार्य विद्यापीठांनी करणे अपेक्षित आहे. शिवाजी विद्यापीठाची आजवरची कारकीर्द पाहिली असता हे विद्यापीठ या कसोटीवर पूर्ण उतरले आहे, हे सांगताना मला आनंद होत आहे. या विद्यापीठाची स्थापना दक्षिण महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची गरज पुरविण्याच्या उद्देशाने १८ नोव्हेंबर, १९६२ रोजी झाली. थोर शिक्षणतज्ज्ञ असलेले तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्ते या विद्यापीठाचे उद्‌घाटन झाले आहे. ही केवळ योगायोगाची गोष्ट आहे, असे मी मानत नाही. डॉ. राधाकृष्णन यांच्यासारख्या तत्त्वचिंतक आणि शिक्षणतज्ज्ञाने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य पुढे नेण्यासाठी केलेले ते बीजारोपणच होते. आज हे बीज चांगले रुजून त्याचा वटवृक्ष शिवाजी विद्यापीठाच्या रूपाने आपल्याला पहायला मिळत आहे.

कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असलेला परिसर निसर्गसंपन्न आहे, साधनसंपत्तीने भरपूर आहे आणि सुजलाम् सुफलाम् आहे. इथल्या माणसाने या साधनसंपत्तीला कष्टाची आणि उद्यमशील स्वभावाची जोड दिली आहे. केवळ साधनसंपत्तीची अनुकुलता असून चालणार नाही. तिचा योग्य वापर करण्याचे कौशल्य राबणाऱ्या हातांमध्ये निर्माण झाले पाहिजे, असे मला वाटते. त्या त्या भौगोलिक प्रदेशाची स्वतःची अशी काही वैशिष्ट्ये असतात. आशाआकांक्षा असतात. या आशाआकांक्षा प्रत्यक्षात आणण्यासाठी उच्चशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता असते. शिक्षणाच्या सुविधा शहरी भागामध्ये मुबलक प्रमाणात असतात. शिक्षणाची ही गंगा ग्रामीण भागापर्यंत नेण्याचे कार्य पुष्कळ महत्त्वाचे आहे. शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे मुख्यत्वे ग्रामीण आहे आणि म्हणूनच या भागाच्या पुढारलेपणात या विद्यापीठाचा वाटा मोठा आहे. शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी करण्यामध्ये या विद्यापीठाचे योगदान खूप महत्त्वाचे आहे.

कोल्हापूर जिल्ह्याला जाज्ज्वल्य अशी ऐतिहासिक परंपरा आहे. ख्रिस्तपूर्ण तिसऱ्या शतकात हे बौद्ध धर्माचे एक महत्त्वाचे केंद्र होते. ज्ञात इतिहासाप्रमाणे कोल्हापूरच्या भूप्रदेशावर पहिली राजवट सातवाहन राजवंशाची होती. त्यानंतर राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, यादव, खिलजी, तुघलक, बहामनी, आदिलशाही असा सत्तांतराचा प्रवास झाला.

कोल्हापूरची भूमी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली भूमी आहे. स्वराज्याचे तोरण बांधून शिवाजी महाराजांनी शेकडो वर्षांच्या गुलामगिरीतून या प्रदेशाला मुक्त केले. करवीर राज्य संस्थापिका रणरागिणी ताराबाई यांनी आपल्या अतुलनीय शौर्याने स्वतःचे नाव अजरामर केले. करवीरचे राजसिंहासन भूषविणाऱ्या सर्वच राज्यकर्त्यांनी या संस्थानाच्या किर्तीत भर टाकली आणि तेथील जनतेच्या कल्याणासाठी सातत्याने प्रयत्न केले.

अत्यंत क्रांतिकारी विचारांचा आणि कृतीशील राजा म्हणून राजर्षी शाहू महाराजांचा विशेष उल्लेख करावा लागेल. सामाजिक सुधारणा व अस्पृश्यतानिवारण याबाबतीत अत्यंत मोलाची कामगिरी

करणारा समाजोद्धारक राजा म्हणून त्यांचा अभिमानाने गौरव केला जातो.

राजर्षी शाहू महाराज यांची कारकीर्द महाराष्ट्रातील बहुजन समाजाला उत्थापनाचे, विकासाचे व जागृतीचे प्रबोधन करणारी ठरली. म्हणूनच कोल्हापूरच्या एकूणच जडणघडणीवर, विकासावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची, प्रेरणेची व कार्याची छाप आहे.

कला, कौशल्य, कारागिरी, शिक्षण, साहित्य, संगीत, क्रीडा इत्यादी क्षेत्रात हा जिल्हा सुप्रसिद्ध आहे. जिल्ह्याचा कलेचा वारसाही असाच समृध्द आहे. विलक्षण कलाप्रेम ही या जिल्ह्याची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. ही कलानगरी आहे, चित्रनगरी आहे, उद्यमनगरी आहे, तशीच ती विद्यानगरीही आहे. कृषी, उद्योग, संस्कृती, कला याबरोबरच शिक्षणक्षेत्रातही कोल्हापूरचे नाव आघाडीवर आहे. अनेक उत्तमोत्तम शिक्षणसंस्था आणि शैक्षणिक कार्यकर्त्यांचे मोहोळ येथे आहे. राज्यभरात नावलौकिक कमावलेली अनेक माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये, अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालये कोल्हापुरात आहेत. विविध क्षेत्रात नाव कमावलेल्यांचे राजाराम कॉलेज हे तर कोल्हापूरचे भूषण आहे. राज्य शासनानेही अगदी सुरुवातीपासून शिक्षण प्रसाराला प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीचा मंगल कलश महाराष्ट्रात आल्यानंतर ज्या विषयांकडे अत्यंत दूरदृष्टीने लक्ष पुरविले गेले, त्यात उच्च शिक्षणाचा क्रमांक बराच वरचा लागतो. प्रत्येक क्षेत्रात पुरोगामी, नवविचार अंगीकारण्याची महाराष्ट्राची परंपरा फार जुनी आहे. यामुळेच महाराष्ट्रात उच्च व तंत्रशिक्षण धोरणाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान या दोन्ही क्षेत्रामध्ये मराठी माणसाने मोठी आघाडी घेतली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत लागणारी उद्योजकता, कष्टाळू वृत्ती, चोख कामाची शाश्वती, वेगळा विचार करण्याची क्षमता आणि तांत्रिक सक्षमता यामुळे मराठी माणूस जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवत आहे.

छत्रपती शाहू महाराजांसारख्या द्रष्ट्या विचारवंताने २० व्या शतकाच्या प्रारंभीच व्यवसायाभिमुख तंत्रशिक्षणाची मुहुर्तमेढ महाराष्ट्रात रोवली होती. ती परंपरा पुढे नेत बायोटेक्नॉलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी, मॉलीक्युलर बायोलॉजी, संगणक विज्ञान अशा वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचा समावेश महाराष्ट्रातील आघाडीच्या विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमात केला आहे. जिल्हा पातळीवरच्या महाविद्यालयांनीही विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे मानांकने मिळवली आहेत.

आजचे युग जागतिकीकरणाचे आहे. आपली पदवी घेतलेला विद्यार्थी या स्पर्धेला समर्थपणे तोंड देऊ शकेल, याची काळजी विद्यापीठांनी घेऊन त्यादृष्टीने सक्षम झाले पाहिजे. राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये जागतिक दर्जाची व्हावीत व देशात येऊ घातलेल्या परदेशी विद्यापीठांचे

आव्हान त्यांना पेलता यावे, असे प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी राज्यातील अभ्यासक्रमात बदल करणे, उच्च शिक्षित प्राध्यापकांच्या नियुक्त्या करणे, महाविद्यालयात व विद्यापीठात संशोधनासाठी अत्याधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, आदी उपक्रमांना राज्य शासनाने प्राधान्य दिले आहे. केंद्र सरकार, उच्च न्यायालय व राज्यपाल यांनी केलेल्या मार्गदर्शक सूचना व राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या निकषांचा अवलंब यासाठी केला जात आहे.

आधुनिक काळाशी सुसंगत असे शिक्षण आपल्या राज्यात देण्यात येत असले तरी त्यात सुधारणेसाठी बराच वाव आहे. स्थानिक परिस्थिती आणि उद्योगधंद्यांना लागणारे तांत्रिक मनुष्यबळ लक्षात घेता अशा प्रकारचे अभ्यासक्रम विद्यापीठांनी महाविद्यालयांद्वारे सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे आवाहन मी या निमित्ताने करू इच्छितो.

देशाने आणि महाराष्ट्र राज्यानेही विविध विद्या शाखा, शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे, एकंदरीत शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी प्रगती केली आहे. मात्र ही वाढ बऱ्यापैकी संख्यात्मक आहे, असे खेदाने म्हणावे लागते. संख्यात्मक वाढीइतकेच, किंबहुना त्यापेक्षा अधिक महत्त्व गुणात्मक वाढीला आहे, असे मानणाऱ्यांपैकी मी एक आहे. शिक्षणाची गुणात्मक वाढ हा आज सर्वच विद्यापीठांनी प्राधान्याचा विषय म्हणून हाती घेतला पाहिजे. अलीकडेच जगातील सर्व विद्यापीठांचा दर्जा आणि गुणवत्तेनुसार मूल्यांकन जाहीर झाले. सांगायला खेद होतो की, जगातील पहिल्या दोनशे विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ स्थान मिळवू शकले नाही. ही स्थिती खरोखरच चिंता वाटावी अशी आहे आणि शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

आज सर्वच क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत आहे. सर्व विद्याशाखांमध्ये नवनवी क्षेत्रे निर्माण होत आहेत. संशोधनाचे क्षेत्र विस्तारते आहे. शिक्षणाचा प्रसारही वेगाने होतो आहे. आजच्या पदवीदान समारंभानिमित्ताने मला आपले लक्ष एका वेगळ्या विषयाकडे वेधायचे आहे. महाराष्ट्राला शिक्षणाची परंपरा फार मोठी आहे. नवी पिढी घडविण्यामध्ये गुरुजनांचा मोठा हात असतो. एकीकडे नवनव्या विद्याशाखा आणि शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात उभ्या होताना दिसतात. मात्र, या संस्थांमधूनन ज्यांनी नवीन पिढी घडवायचे अशा तज्ञ, प्रशिक्षित, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य यांची मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवते आहे. प्राचार्यांची दीडहजाराहून अधिक पदे रिक्त आहेत. यामुळे प्राचार्यांची सेवानिवृत्ती वयोमर्यादा वाढविण्याचा निर्णय नुकताच सरकारला घ्यावा लागला. यासाठी बुद्धीमान विद्यार्थ्यांनी अध्यापनाच्या क्षेत्राकडे वळणे आवश्यक आहे. विद्यार्जनाप्रमाणे विद्यादानही महत्त्वाचे क्षेत्र आहे. यामुळे एक करिअर म्हणूनही युवक–युवतींनी अध्यापन क्षेत्राकडे पाहिले पाहिजे. आपणापैकी जास्तीत जास्त जणांनी या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन मी या निमित्ताने करतो.

आजचा काळ ज्ञानाधिष्ठित समाजाचा आहे. माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे जग दाराशी आले आहे. जग हे वैश्विक खेडे Global Village बनले. यापुढील समाजरचना ज्ञानाधारीत असणार आहे. या सर्वांचा डोळसपणे विचार करून आपल्यापैकी प्रत्येकाला जीवनाची दिशा निश्चित करावयाची आहे. तरूण पिढीने हे आव्हान पेलण्याची तयारी करून तशी क्षमता स्वत:मध्ये निर्माण केली पाहिजे.

तरूणपण हे आदर्शवादी असते. तुमची उमेद, तुमच्या आशा–आकांक्षा आणि तुमची स्वप्ने उदंड आहेत, त्याच्या जोडीला वास्तवाचे भान ठेवून त्याला योग्य वळण लावण्याचा प्रयत्न केला तर आमच्या पिढीला जे साध्य होऊन शकले नाही ते तुम्ही साध्य करू शकाल. येथे मिळालेल्या ज्ञानाची आणि कलाकौशल्याची शिदोरी घेऊन तुम्ही आता बाहेरच्या अफाट जगात जात आहात. या प्रवासात येथे मिळविलेले ज्ञान–कौशल्य तुम्हाला मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडेल. तुमच्या प्रयत्नांना आणि पुढील वाटचालीस मी हार्दिक शुभेच्छा देतो.

दिवंगत माजी पंतप्रधान राजीवजी गांधी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेसमोर जे ऐतिहासिक भाषण केले, त्याचा संदर्भ देऊन मी आपला निरोप घेणार आहे. राजीवजी म्हणाले होते की, I am Young, I have dreams too ! त्यांच्या या उद्‌गारात मोठा आशावाद आणि आत्मविश्वास दडलेला होता. तुम्हीही सारे तरूण हा, मोठे स्वप्ने घेऊन बाहेरच्या जगात या, स्वप्ने जागेपणी पहा, विजयश्री तुमचीच वाट पहात आहे. धन्यवाद.

जयहिंद ! जय महाराष्ट्र !!

❑❑❑